दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.२५ ऑक्टोबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ६५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 25 Oct 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 65 | Pages 4 | Rate 4 Rs

# आरएसएसचा संविधान अन् तिरंगा स्वीकारण्यास नकार-वंचित बहुजन आघाडीचा आरोप

## छत्रपती संभाजीनगर येथे 'वंचित'चा संघ कार्यालयावर मोर्चा

दैनिक वादळ वार्ता

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भारताचे संविधान, तिरंगा ध्वज तथा महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट कायद्याची प्रत स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे संघाचा संविधान, तिरंगा व स्वतःची नोंदणी करण्यास ठाम विरोध असल्याचे स्पष्ट होते, असा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.वंचित बहुजन आघाडीने शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. यासाठी हजारो आंबेडकर अनुयायी शहरातील क्रांती चौकात जमले होते. पोलिसांनी त्यांच्या मोर्चाला परवानगी नाकारली, पण तरीही वंचितचे कार्यकर्त्यांनी आपला मोर्चा काढला. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला भारताचे संविधान, तिरंगा व महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्टची प्रत देण्याचा प्रयत्न केला. पण संघाने त्यांचा स्वीकार करण्यास नकार दिला. वंचितचा भारतीय राष्ट्रध्वजाचा सन्मान न करणाऱ्या संघाला तिंरगा देण्याची इच्छा होती. कोणतीही नोंदणी नसणाऱ्या या संघटनेला महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्टची प्रत देण्याची इच्छा होती. पण त्यांनी त्यांच्या जागी औरंगाबादच्या डीसीपींनी या गोष्टी स्वीकारल्या, असे वंचितने म्हटले आहे.






### सुजात आंबेडकरांची उपस्थिती, 'आरएसएस मुर्दाबाद'च्या घोषणा

या 'जन आक्रोश मोर्चात' वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची उपस्थिती होती, ज्यामुळे भीमसैनिकांमध्ये मोठा उत्साह संचारला. मोर्चात सहभागी झालेल्या युवक, महिला आणि नागरिकांनी हातात फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी 'ठडड मुर्दाबाद' च्या घोषणांनी औरंगाबाद दणाणून गेला.

### संभाजीनगरात कडेकोट बंदोबस्त

वंचित बहुजन आघाडीच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर क्रांती चौक ते बाबा पेट्रोल पंपापर्यंत पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. वंचितने यावरही आक्षेप घेतला. पोलिस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा बचाव का करत आहेत? असा प्रश्न या प्रकरणी पक्षाने उपस्थित केला आहे.

### कार्यालयाजवळ तणाव; पोलिस-कार्यकर्ते आमनेसामने

हा 'जन आक्रोश मोर्चा' आरएसएसच्या कार्यालयाकडे (बाबा पेट्रोल पंप जवळ) जात असताना पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावत गर्दीला कार्यालयाकडे जाण्यापासून अडवले. या अडवणुकीमुळे वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि पोलिस आमनेसामने आले.

# तळोदाजवळ थरार! भरधाव मोटार सायकलने पादचाऱ्याला उडवले

## गंभीर जखमी करून आरोपी पसार, ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

### रांझणी-चिनोदा रोडवर सायंकाळी घडला अपघात; बेदरकार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात रांझणी ते चिनोदा रस्त्यावर एका हृदयद्रावक अपघातात ६५ वर्षीय पादचारी वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. भरधाव आणि बेदरकारपणे मोटारसायकल चालवणाऱ्या आरोपीने पादचाऱ्याला जोरदार धडक दिली आणि मदत न करता घटनास्थळावरून पलायन केले. याप्रकरणी तळोदा पोलीस ठाण्यात मोटारसायकल चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१) सह मोटार वाहन कायदा कलम. १८४ अंतर्गत 'प्राणांकित निरंक अपघात' प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवार, २२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास. रांझणी गावात रांझणी ते चिनोदा रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी. मयत ज्योतीसिंग ठगा रहासे (वय ६५, रा. रामपूर, ता. शहादा) हे लघुशंकेसाठी रस्त्याच्या कडेला गेले होते आणि परत येत असताना हा अपघात झाला. यासंदर्भात राजेंद्र मगन पाडवी (वय ३९, राहणार चिनोदा) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी पिंट्या विजय पाडवी राहणार रांझणी तालुका तळोदा हा आपल्या ताब्यातील मोटारसायकल अत्यंत हयगयीने आणि बेदरकारपणे भरधाव वेगाने चालवत रांझणीकडून चिनोदाकडे जात होता. त्याने रस्त्यावरुन पायी चालणाऱ्या ज्योतीसिंग रहासे यांना जोरदार धडक दिली.या भीषण धडकेत ज्योतीसिंग रहासे यांच्या डोक्यास, छातीस, पोटास, हात आणि पायांना गंभीर दुखापत झाली. या दुखापतींमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. मात्र, अपघात घडवूनही आरोपी पिंट्या पाडवी याने कायद्याची कोणतीही पर्वा न करता, जखमी व्यक्तीला मदत न करता किंवा पोलिसांना खबर न देता, घटनास्थळावरून त्वरित पळ काढला.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांकडून भरधाव वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.या गंभीर गुन्ह्याची फिर्याद मिळाल्यानंतर, तळोदा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी पिंट्या पाडवी आणि संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा क्र. २९७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कठोर कलम १०६(१) - हिट-अँड-रन प्रकरणातील शिक्षा) आणि मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ (धोकादायक ड्रायव्हिंग) नुसार गुन्हा दाखल केला आहे.अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजु लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जोगेश वळवी करत आहेत.

## राज्यपाल मा.देवव्रत आचार्य व आणि मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांना डॉ.नीलम गोऱ्हे यांच्याकडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

प्राकृतिक कृषी संमेलन - २०२५ हा भव्य कार्यक्रम आज या राजभवनातील दरबार हॉल येथे होता. हे संमेलन महाराष्ट्र राज्यपाल मा. श्री आचार्य देवव्रत तसेच या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पार पडले. या संमेलनात विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून राज्यपाल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.आणि त्यांनी यावेळी दोन्ही मान्यवरांना भेटवस्तू देऊन दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मा.ना. देवेंद्र फडणवीसांना बारबाडोसच्या ६८ व्या सिपीए (राष्ट्रकुल संसदिय संघटना) परिषदेतून यशस्वी सहभाग त्यांचा झाल्याची माहितीही दिली.


# भाऊसाहेब घोडके यांची भारतीय जनता मजूर संघाच्या राष्ट्रीय सचिव पदावर नियुक्ती

## सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आमला गावचे भुमी पुत्र सध्या दिंद्रुड येथे वास्तव्यास असलेले भाऊसाहेब घोडके यांची भारतीय जनता मजूर संघ (औद्योगिक) या देशभर कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित संघटनेने संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणा साठी उल्लेखनीय योगदान देणारे भाऊसाहेब लक्ष्मण घोडके अमला ता.धारूर, जि.बीड) यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती केली आहे.या नियुक्तीची घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शांतप्रकाश जाटव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, नियुक्तीपत्रावर अड. रक्षपाल सिंह,राष्ट्रीय सरचिटणीस,भारतीय जनता मजूर संघ, चरण सिंहजी दिल्ली प्रदेश प्रभारी यांनी केली आहे.भाऊसाहेब घोडके हे संघटनेचे निष्ठावान कार्यकर्ते असून, ग्रामीण भागातील कामगार व शेतकरी वर्गाच्या समस्यांवर सातत्याने कार्यरत आहेत. सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कौशल्य यामुळे त्यांनी संघटनेत विशेष स्थान निर्माण केले आहे.



नवीन जबाबदारी मिळाल्यानंतर भाऊसाहेब घोडके यांनी सांगितले की, ही माझ्यासाठी अभिमानाची व जबाबदारीची वेळ आहे. संघटनेच्या उद्दिष्टांसाठी आणि कामगारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी मी पूर्ण निष्ठेने कार्य करीन.संघटनेच्या वर्तुळात त्यांच्या नियुक्तीचे स्वागत करण्यात आले असून,कार्यकर्त्यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# जुगडखेतमध्ये शेतकऱ्याच्या घराला भीषण आग

# ४ जनावरे, ३ बकऱ्या आणि धान्य जळून खाक; ११ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान

## माकत्या वसावे यांचे कुटुंब उघड्यावर; मदतीची अपेक्षा

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील जुगडखेत (दुधलीपादर) येथील एका शेतकरी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजून ३० मिनिटाच्य सुमारास माकत्या बोंडा वसावे (वय ५५) यांच्या राहत्या घरी अज्ञात कारणांमुळे भीषण आग लागल्याची गंभीर घटना घडली. या दुर्घटनेत वसावे यांचे घर, त्यातील संपूर्ण साहित्य, शेतीसाठी लागणारे धान्य आणि लाखो रुपयांचे पशुधन जळून राख झाले आहे.जुगडखेत येथील रहिवासी माकत्या बोंडा वसावे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २१/१०/२०२५ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास त्यांच्या घरात अचानक आग लागली. आग इतकी वेगाने पसरली की, घरातील मौल्यवान वस्तू वाचविण्यासाठी त्यांना वेळ मिळाला नाही. या घटनेत त्यांचे एकूण ११ लाख ८६ हजार ४० रुपयांचे (अंदाजित) नुकसान झाले आहे.

नुकसानीचत

३ बैल आणि १ गाय (किंमत अंदाजित: १,८०,०००/- रुपये)

३ बकऱ्या (किंमत अंदाजित: ३०,०००/- रुपये )

४० क्विंटल मक्का, भगवारी, भगर व इतर धान्य (किंमत अंदाजित: १,०६,०४०/- रुपये)

घरात ठेवलेले ५०० रुपयांच्या १७० नोटा असलेली रोख रक्कम (८५,०००/- ते १,८५,०००/- पर्यंत अंदाजित)



दैनंदिन भांडी व इतर वस्तू (किंमत अंदाजित: ६०,०००/-रुपये)

लाकडी दांड्या, खांब, बांबूचा माळा, बांबूचे कुड इत्यादी (किंमत अंदाजित: ६,२५,०००/-रुपये)

एकूण अंदाजित नुकसान: ११,८६,०४०/-रुपये.

या घटनेची खबर वसावे यांनी उशिरा मोलगी पोलीस ठाण्यात दिल्यानंतर लगेचच दिनांक २१/१०/२०२५ रोजी रात्री ८ वाजून वाजता २८ मिनिटाला अग्नी उपद्रव क्र. ०२/२०२५ प्रमाणे दाखल करण्यात आश्रळ आहे. पोलीस हेडकॉन्स्टेबल वनसिंग पाडवी यांनी खबर दाखल करून तेच या प्रकरणाचा तपास करत आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही. माकत्या बोंडा वसावे हे शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. या आगीत त्यांचे पशुधन (जे त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते) आणि साठवून ठेवलेले धान्य पूर्णपणे नष्ट झाले आहे. तसेच, राहते घर जळाल्याने वसावे कुटुंब उघड्यावर आले आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासनाने या गरीब शेतकरी कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

## संपादकीय

# प्रतिष्ठा महिलांच्या हाती

क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या देशांमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) एक वेगळेच वलय आहे. सर्वाधिक श्रीमंत क्रिकेट मंडळ असा बीसीसीआयचा जगभरात नावलौकिक आहे. भारतीय क्रिकेट संघामध्ये सुरुवातीपासूनच अनेक नावलौकिक प्राप्त खेळाडूंचा समावेश राहिला आहे. क्रिकेट खेळातील अनेक विक्रम भारतीय खेळाडूंच्या नावावर आहेत. अन्य देशातील क्रिकेट खेळाडूंच्या तुलनेत भारतीय खेळाडूंना मिळणारे मानधन अधिक आहे. पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये पुरुष आणि महिला संघांच्या मानधनामध्ये विषमता होती. पण बीसीसीआयची सूत्रे जय शहा यांच्याकडे गेल्यानंतर बीसीसीआयचा चेहरा-मोहरा बदलण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. महिला क्रिकेटपटूंनाही आता पुरुष खेळाडूंच्या बरोबरीने मानधन मिळण्यास सुरुवात झाल्याने मानधनातील दुजाभाव संपुष्टात आला आहे. भारतीय पुरुष क्रिकेट संघामध्ये मागील अनेक वर्षांपासून एकाहून एक अशा अनेक मातब्बर खेळाडूंचा समावेश राहिलेला आहे व आजही भारतीय क्रिकेट पुरुष संघामध्ये समावेश होण्यासाठी कमालीची चुरस निर्माण झालेली आहे. अनेक दर्जेदार, गुणवंत खेळाडू खेळाचा क्लास असताना व दर्जामध्ये सातत्य असताना प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. एकेकाळी डायना एडल्जी, मिताली राजसारख्या मोजक्याच खेळाडूंमुळे भारतीय महिला क्रिकेटच्या संघाची ओळख असायची, पण अलीकडच्या काळात भारतीय महिला क्रिकेट संघाने कात टाकल्याप्रमाणे प्रगती केली आहे. भारतीय महिला संघाची एक दर्जेदार संघ म्हणून ओळख होत असून एक आक्रमक चेहरा भारतीय महिला क्रिकेट संघाला प्राप्त झाला आहे. अनेक विक्रम भारतीय महिला क्रिकेटर्सच्या खात्यात जमा असून अनेक दिग्गज संघांना सामन्यांमध्ये भारतीय महिला क्रिकेटर्सने आपल्या कामगिरीच्या बळावर पाणी पाजले आहे. सध्या भारतीय क्रिकेटमधील पुरुष आणि महिला संघाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भारतीय पुरुष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाची फारशी प्रभावी कामगिरी झालेली नाही. एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत सलग दोन सामने भारताला गमवावे लागले असून मालिकाही भारताला गमवावी लागली आहे. विराट कोहली, कर्णधार शुभमन गिल या दिग्गज खेळाडूंच्या फलंदाजीतील अपयशामुळे भारतीयांची चिंता वाढली आहे. गोलंदाजांनाही फारशी प्रभावी कामगिरी करता आलेली नाही. अर्थात ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन त्यांना पराभूत करणे एक अग्निदिव्यच आहे. त्यात फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर २६५ धावांचे रक्षण करणे कोणत्याही संघातील गोलंदाजांसाठी अवघड काम आहे. त्यातल्या त्यात दुसऱ्या सामन्यामध्ये रोहित शर्माला गवसलेला सूर क्रिकेटप्रेमींना दिलासा देणारी बाब आहे. विराट कोहलीला दोन्ही सामन्यात खाते उघडता आले नाही, तर कर्णधार शुभमन गिलला दोन्ही सामन्यांतील आकडेवारी एकत्रित केली तरी २५च्या पार करता आलेली नाही.शनिवारी, २५ ऑक्टोबर रोजी भारत व ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेतील अखेरचा सामना होत असून मालिकेतील व्हाईट वॉश टाळण्यासाठी व प्रतिष्ठा जपण्यासाठी भारताला अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्याची कामगिरी करून दाखवावी लागणार आहे. त्या तुलनेत महिला भारतीय क्रिकेट संघाची सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी नक्कीच अभिमानास्पद आहे. विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलांनी गुरुवारी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विश्वचषकांचा संभाव्य विजेता म्हणूनही आज भारतीय महिला संघाकडे पाहिले जात आहे. दोनदा उपविजेतेपद आणि तीन वेळा उपांत्य फेरी. आयसीसी महिला विश्वचषकात आजवर विजयाच्या असे जवळ येऊनही भारताला विजेतेपदाचा आनंद साजरा करता आलेला नाही. उपांत्य फेरी व त्यापाठोपाठ फायनलचा सामना जिंकून पण हाच इतिहास बदलण्याची चांगली संधी भारताकडे चालून आलेली आहे. विश्वचषक स्पर्धेदरम्यान भारतीय महिलांचा प्रवास हा अडथळ्याची मालिका पार करतच झालेला आहे. भारतीय संघाचा स्पर्धेतील प्रवास चढ-उतारांचा राहिला. त्यांनी श्रीलंकेविरुद्ध आणि पाकिस्तानविरुद्ध सलग विजय मिळवून विश्वचषक स्पर्धेत चांगली सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध त्यांना सलग तीन सामन्यांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. अखेरीला न्यूझीलंडविरुद्धच्या प्रतिष्ठेच्या सामन्यात भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करताना ३४० धावांपर्यंत मजल मारली व न्यूझीलंडला पावणेतीनशेच्या घरातच रोखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. विश्वचषक स्पर्धेदरम्यान या स्पर्धेत भारतीय संघाने दाखवलेले धैर्य आणि जिद्द कौतुकास्पद आहे. सुरुवातीच्या पराभवानंतरही त्यांनी जोरदार पुनरागमन करत उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाने दाखवलेला आत्मविश्वास पुढील सामन्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या बलाढ्य संघांसमोर भारतीय संघाला उपांत्य फेरीत कडवी झुंज द्यावी लागेल. मात्र, न्यूझीलंडविरुद्धच्या विजयाने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.आता सर्वांचे लक्ष या उपांत्य सामन्यांकडे लागले आहे, जिथे विश्वविजेतेपदासाठी चुरशीची लढत पाहायला मिळेल. भारतीय महिला संघाच्या फलंदाजीने दणकेबाज खेळी करत स्पर्धेमध्ये ३००चा आकडा अनेकदा पार केला आहे. स्मृती मानधनाने खेळीमध्ये दाखविलेल्या सातत्यामुळे मागील तीन सामन्यांमध्ये भारताला चांगली मजल मारणे शक्य झाले. भारतीय क्रिकेट संघाची प्रतिष्ठा आता खऱ्या अर्थाने पणाला लागलेली आहे. पुरुष क्रिकेट संघाला आपली पत राखण्यासाठी आणि एकदिवसीय मालिकेतील व्हाईट वॉशची नामुष्की टाळण्यासाठी आजचा सामना जिंकावा लागणार आहे. महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत पोहोचल्याने भारतीयांच्या आशा उंचावल्या आहेत. सध्या भारतीय महिला फलंदाजांना गवसलेला सूर पाहता व आक्रमक खेळी पाहता वर्ल्ड कप आता दूर नाही, अशी आशा बाळगायला वाव आहे.

# पोलिसांच्या अत्याचाराने संपदा मुंडेंचा जीव घेतला

## रक्षकच भक्षक झाले,कठोर कारवाईची मागणी–राज्य प्रवक्ते नितीन सोनवणे

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**


सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. संपदा मुंडे यांनी गेल्या रात्री टोकाचं पाऊल उचलून आत्महत्या केली. हातावर पेनाने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी पोलिस निरीक्षक गोपाल बदने याच्यावर चार वेळा बलात्कार आणि दुसऱ्या पोलिस कर्मचारी प्रशांत बनकर याच्यावर शारीरिक-मानसिक छळ केल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. या घटनेने वैद्यकीय क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून, ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तात्काळ दोषींवर कठोरात्कठोर कारवाई करून पीडितेच्या आई-वडिलांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.डॉ. संपदा मुंडे या बीड जिल्ह्यातील साध्या शेतकरी कुटुंबातील होत्या. आई-वडिलांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांना शिकवून डॉक्टर आणि नंतर वैद्यकीय अधिकारी बनवलं. डॉ. मुंडे यांनी वरिष्ठांकडे अनेकदा लेखी तक्रारी केल्या होत्या. माझ्यावर अन्याय होत आहे, मी आत्महत्या करीन, असा इशाराही त्यांनी दिला होता. मात्र, प्रशासनाने त्यांच्या तक्रारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं आणि परिणामी ही दुर्दैवी घटना घडली. सुसाईड नोटमध्ये खासदार आणि त्यांच्या स्वीय सचिवाचा उल्लेख असल्याचंही समोर आलं असून, या प्रकरणाला आता राजकीय वळण लागण्याची शक्यता आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना प्रशासनावरून आक्रमक टीका केली आहे.



न्याय्मिळावा बीड जिल्ह्याची लेक, फलटण येथे वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या डॉ.संपदा मुंडे यांच्यावर आत्महत्या करण्याची दुर्दैवी वेळ आणणाऱ्या नराधमांना तात्काळ आणि कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. सोनवणे म्हणाले, प्रशासनाने कडक कारवाई करून या ताईला आणि तिच्या आई वडिलांना न्याय मिळवून द्यावा.आईवडिलांनी लेकिला जन्म दिला, लहानाचं मोठं केलं, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत लेकीला शिकवलं, डॉक्टर बनवलं, अधिकारी बनवलं, लेकिने प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष केला, आईवडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी रात्रंदिवस कष्ट करून यश मिळवलं आणि काही गिधाडांच्या, श्वापदांच्या अतिरेकी कृत्याचे एका क्षणात सगळं होत्याचं नव्हतं झालं, मायबापांच्या काळजाच्या ठिकऱ्या उडाल्या असतील. त्या गिधाडांना, हिंस्र श्वापदांना सोडता कामा नये. न्याय मिळावा अशी अपेक्षा!सोनवणे यांनी पुढे सांगितलं, रक्षकच जर भक्षक होत असतील तर 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रिद वाक्य घेऊन चालणाऱ्या पोलिस प्रशासनाची प्रतिमा मलिन होतेय. कठोर कारवाई व्हायला हवी! या प्रकरणात फलटण पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, साताराचे एसपी दोषी जी यांनी तात्काळ चौकशी सुरू केल्याची माहिती दिली आहे. मात्र, ऑल इंडिया पँथर सेनेच्या कार्यकर्त्यांनी सातारा आणि फलटणमध्ये निदर्शनांचा इशारा दिला असून, पीडितेच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी सुरू केली आहे.या घटनेने वैद्यकीय संघटना आणि महिला संघटनांमध्येही रोष निर्माण झाला आहे. दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली असून, हे प्रकरण संघटनेच्या न्यायालयात घेऊन जाण्याचा इशारा दिला आहे. डॉ. संपदा मुंडे यांच्या अकाली मृत्यूमुळे फलटण शहरात शोककळा पसरली असून, प्रशासनाने तातडीने न्याय दिला नाही तर मोठा गोंधळ होईल, असा इशारा नितीन सोनवणे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# कोकण रेल्वेचे फलाट अन् अपघातांची घंटा

१५ सप्टेंबर १९९० रोजी कोकण रेल्वेमार्गाच्या कामाची पायाभरणी रोहा येथे करण्यात आली. प्रत्यक्षात २६ जानेवारी १९९८ रोजी कोकण रेल्वेसेवा सुरू झाली. या सेवेला आता २७ वर्षे पूर्ण झाली; परंतु कोकण रेल्वे महामार्गाचा विचार करता अजूनही कोकण रेल्वे महामार्गावरील स्थानकातील काही फलाटांची उंची वाढवण्यात आलेली नाही. ही अपघाताची धोक्याची घंटा आहे. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून प्रत्येक रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची रेल्वे गाडीच्या दरवाजाइतकी समान असावी. म्हणजे गाडीत चढता- उतरताना प्रवाशांना त्रास होणार नाही. तेव्हा रेल्वे प्रशासनाला जागरूक करून प्रवाशांचा प्रवास सुखद होण्यासाठी केलेला एक प्रयत्न.एका बाजूला अरबी समुद्र, दुसऱ्या बाजूला पश्चिम घाट, नद्या-नाले, डोंगर-दऱ्या आणि घनदाट जंगल त्यामुळे अशक्य वाटणारे शक्य झाल्याने कोकणातील चाकरमानी आपल्या गावी सकाळी जाऊन रात्री मुंबईला परत येऊ शकतो. हे फक्त आणि फक्त कोकण रेल्वे महामार्गावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांमुळे शक्य झाले आहे. तेव्हा असे जरी असले तरी रेल्वे गाड्यांचा दरवाजा व रेल्वे फलाटांची उंची समान असणे आवश्यक आहे. भविष्यात दुहेरी वाहतूक होणार हे मात्र नक्की असले तरी कोकण रेल्वे महामार्गावरील रेल्वे स्थानकांचा विचार केल्यास ठरावीक स्थानके सोडली तर अजूनही काही ठिकाणी फलाटांची उंची वाढविण्यात आलेली नाही. ती अजूनही रेल्वे रूळाइतकीच आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. तेव्हा दुहेरी वाहतूक होण्याला काही काळ असला तरी प्रत्येक रेल्वे स्थानकामध्ये



रेल्वे थांबते. याला जलद गाड्या अपवाद आहेत. त्या ठरावीक रेल्वे स्थानकात थांबतात. तेव्हा प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची रेल्वे दरवाजाइतकी वाढविणे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कोकणात रेल्वेसेवा सुरू होऊन आता जवळजवळ २७ वर्षे झाली; परंतु अजूनही काही रेल्वे स्थानकावर फलाट तयार करण्यात आलेले नाही. वास्तविक रेल्वे स्थानक म्हटले की रेल्वे स्थानकावर गाडीच्या लांबीचे फलाट बांधणे आवश्यक आहे. ते सुद्धा रेल्वे दरवाजाच्या उंची बरोबर असले पाहिजेत. कारण ही रेल्वे स्थानकाची मूलभूत गरज आहे. रेल्वे ही प्रवाशांच्या सेवेसाठी असते तेव्हा प्रवाशांना उत्तम प्रकारे सेवा मिळालीच पाहिजे. त्यासाठी रेल्वे फलाटांची उंची रेल्वे दरवाजाच्या उंचीइतकी असायला हवी. म्हणजे गाडीमध्ये प्रवाशांना चढता किंवा उतरतांना त्रास होत नाही; परंतु फलाटाची उंची गाडीच्या दरवाजाइतकी नसल्याने वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती, लहान मुले आणि गरोदर महिला यांना गाडीत चढणे किंवा उतरणे शक्य होत नाही. तसेच आजारी व्यक्ती व जड सामान नेणे अवघड असते. अशा अनेक कारणासाठी रेल्वे दरवाजा इतकी उंची रेल्वे फलाटाची असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे गर्दीच्या वेळी खाली उतरताना धक्काबुक्की झाल्यास प्रवाशांना इजा होण्याची शक्यता असते. म्हणजे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून प्रवास करणे व फलाट नसणाऱ्या रेल्वे स्थानकात उतरणे धोकादायक आहे. तरी कोकणी माणसात आपापसात हेवेदावे जरी असले तरी प्रवासात एकमेकांना समजून घेतात. रेल्वेत शिरले काय समोरच्या व्यक्तीला आपुलकीने विचारणार काय हो, खय उतरणार? त्याचा स्टेशन समजला काय त्यांचे गजाली सुरू होतले. अगदी रेल्वे गाडीतून उतरापर्यंत. असो..! मनमिळावू कोकणी माणूस आसा.

तेव्हा कोकणात रेल्वे सुरू झाल्याने लालपरीपेक्षा कमी तिकीट व आरामदायी प्रवास असल्याने कोकणी माणूस सर्रास रेल्वेने प्रवास करणे जास्त पसंत करतात. त्यामुळे लालपरीकडे कोकणी माणूस पाट फिरवू लागला आहे. मात्र लालपरी चालली पाहिजे म्हणून काही चाकरमानी लालपरीने आपल्या गावी येणे-जाणे करणे पसंत करतात. उन्हाळी सुट्टी, गणेश चतुर्थी व नाताळ या मोसमात तर रेल्वे गाडीने जाऊच नये असे वाटते. कारण तिकीट जरी आरक्षित केलेले असले तरी गाडीत चढणे कठीण असते. मागील उन्हाळ्यात जाताना माझा एक मित्र सांगत होता की, मी स्लीपरचे तिकीट काढले होते. दादरला कोकण रेल्वेत कसाबसा चढलो. मात्र माझ्या जागेपर्यंत जाण्यासाठी रत्नागिरी उजाडली. म्हणजे प्रवाशांचे गर्दीच्या वेळी किती हाल होतात याची कल्पना येते. तो सुद्धा रात्रीचा प्रवास हे विसरून चालणार नाही. मग गर्दीच्या वेळी फलाट नसलेल्या स्थानकात कशाप्रकारे प्रवाशांचे हाल होत असतील याचे वर्णन न केलेले बरे. तेव्हा अशा विविध घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अर्थात रेल्वे मंत्रालयाने रेल्वे प्रवाशांचे हित लक्षात घेऊन ज्या रेल्वे स्थानकात फलाट नाहीत ते प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व रेल्वे प्रशासनाच्या हितासाठी तातडीने बांधून घेणे गरजेचे आहे. तेव्हा कोकण रेल्वे महामार्गावर ज्या रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची वाढवावी अशी स्थानिक नागरिकांची किंवा रेल्वे प्रवाशांची मागणी असेल त्या रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची त्वरित वाढविण्यात यावी. त्यासाठी संबंधित रेल्वे स्थानकातील फलाटांचे प्रस्ताव तयार करून रेल्वे मंत्रालयाकडे सादर करणे गरजेचे आहे.

# मुख्यमंत्र्यांचा विदर्भ औद्योगिक विकासाचा संकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरला नवे लॉजिस्टिक हब बनवण्याची घोषणा केली असून त्यात २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. यातील प्रमुख प्रकल्पाचा भूमिपूजन समारोह येत्या एक महिन्यात होईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या घोषणेचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

नागपूर हे देशाच्या हृदयस्थानी आहे. विशेष म्हणजे हे शहर रस्ते रेल्वे आणि हवाई वाहतुकीने देखील देशभरात जोडले गेले आहे. त्यामुळे मालवाहतुकीचे आदान-प्रदान करणारे हे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते. अशावेळी इथे लॉजिस्टिक हब जर विकसित झाले, तर विदर्भाच्या विकासाला नवी चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार यातील प्रमुख प्रकल्प अमरावती मार्गावर समृद्धी मार्गानजीक ८५ एकर जागेवर एक्स. एस. आय. ओ. कंपनीचा लॉजिस्टिक पार्क अस्तित्वात आहे. याच्या बाजूलाच १०५ एकर जमीन खरेदी करण्यात आली असून तिथे सातशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे. १६ नोव्हेंबर रोजी या पार्कचे भूमिपूजन जवळपास निश्चित आहे. इथे ११५० कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. इथे जवळच आणखी एक ३०० कोटींचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून त्याचे कामही सुरू झाले आहे.वर्धा जिल्ह्यात बुटीबोरी येथे ३० एकर जमीन खरेदी करण्यात आली असून येथेही २५० कोटींचा प्रकल्प साकारण्यात येत आहे. नागपुरात वर्धमान नगर येथे साडेचार एकर जमिनीवर २५० कोटींचा प्रकल्प साकार होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकारण्यात येत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. येथे उच्च दर्जाचे औद्योगिक साठवण आणि वेअर हाऊसिंग स्पेस निर्माण होणार आहे. मे महिन्यात राज्य सरकारबरोबर ५१२७ कोटींचा करार करण्यात आला. येथे प्रकल्पात स्मार्ट तंत्रज्ञान उच्च फ्लॉवर लोड क्षमता कार्यक्षम मटेरियल हँडलिंग सिस्टिम्स आणि इंटिग्रेटेड युटिलिटीज असतील अशीही माहिती देण्यात




आली आहे.हे बघता मुख्यमंत्री फडणवीस यांनी विदर्भाचा औद्योगिक विकास लवकरात लवकर करण्याचा चंग बांधला आहे असे दिसून येते. विदर्भाच्या मागासलेपणाची जेव्हा चर्चा होते तेव्हा मोठे उद्योग आले नाहीत आणि आले तर ते चालले नाहीत हा मुद्दा समोर येतो. फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळात नियोजन केले आणि आता ते त्याचे इम्प्लिमेंटेशन करीत आहेत असे दिसून येते आहे. विदर्भात नागपूरचा मिहान प्रकल्प फडणवीसांच्याच पाठपुराव्यामुळे पूर्णत्वास येतो आहे. मिहान पूर्णत्वास आले, तर हवाई वाहतुकीद्वारे मालाची ने-आण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे विदर्भातील कृषी उत्पादने आणि कृषी प्रक्रिया उद्योगात तयार होणारी उत्पादने जगभरात पाठवणे शक्य होणार आहे. शिवाय नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गही तयार झाला आहे. तो गोंदिया-गडचिरोली आणि चंद्रपूरपर्यंत विस्तारित करण्याचीही योजना कार्यान्वित होत आहे. या सर्वच परिसरात नवे नवे उद्योग आणण्यासाठी फडणवीस प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्नाने नागपुरात सोलर डिफेन्सचा विस्तार होत असून त्यात ६८० कोटींची गुंतवणूक होणार आहे. कालच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या प्रकल्पासाठी २२३ एकर जमिनीचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

विदर्भात फक्त नागपूरच आहे असे नाही, तर उर्वरित जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी सुद्धा फडणवीसांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांच्याच संकल्पनेतून अमरावती येथे टेक्स्टाईल पार्क उभा होतो आहे आणि त्याला पूरक उद्योगदेखील उभे व्हायला सुरुवात झाली आहे. अमरावतीतून आतापर्यंत हवाई मार्गाने वाहतूक करायची तर नागपूरला यावे लागत होते. मात्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून अमरावतीत देखील विमानतळ उभे झाले आहे. त्याचबरोबर अकोल्यात असलेल्या विमानतळाचाही विस्तार करण्याची योजना त्यांनी हाती घेतली आहे. हे बघता विदर्भात आता नागपूरसह अमरावती-अकोला, चंद्रपूर आणि यवतमाळ येथे विमान वाहतूक करण्याची सोय झाली आहे असे म्हणता येऊ शकते. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील अत्यंत विकसित जिल्हा म्हणून ओळखला जात होता. परिणामी तिथे नक्षलवाद वाढला होता. मात्र फडणवीस यांच्या पुढाकाराने तिथे आता विकासकामे तर पूर्ण झालीच, पण लॉईड स्टीलच्या मदतीने मोठा प्रकल्प सुरू झाला आहे. त्याशिवाय जीएसडब्ल्यू प्रकल्पाचेही काम जोरात आहे. त्यांना ९००० एकर जमीन देण्याची व्यवस्थाही होत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रात समतोल औद्योगिक विकास व्हावा म्हणून आधीच्या सरकारने प्रत्येक जिल्ह्यात एमआयडीसी वसाहती उभ्या केल्या होत्या. याच योजनेत विदर्भात ९८ औद्योगिक वसाहती उभ्या केल्या. मात्र त्या सर्वच वसाहतींची आणि तिथल्या उद्योगांची अवस्था अतिशय दयनीय असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याची दखल घेऊन सरकारला निर्देशही दिले होते. याच स्तंभातून त्यावर प्रकाश टाकण्यात आला होता. मात्र फडणवीसांचे असे नियोजन राहिले आणि त्याला विदर्भातील सर्वच स्तरातील नेते संघटना आणि सामान्य नागरिक यांनी सहकार्याचा हात पुढे केला तर आपसूकच विदर्भाचा औद्योगिक विकास व्हायला सुरुवात होईल आणि उच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करण्याची गरजही लागणार नाही.मात्र त्यासाठी प्रशासन राजकीय नेते आणि औद्योगिक संघटना यांच्यात समन्वय असायला हवा. समन्वयाने काम झाले, तर फडणवीस यांच्या स्वप्नातील औद्योगिक विकास अशक्य नाही. मुख्यमंत्री होण्याआधी देवेंद्र फडणवीस हे कट्टर विदर्भवादी होते. विदर्भाचे वेगळे राज्य व्हावे यासाठी त्यांनी २०१०-११ मध्ये विदर्भात एक संपर्क यात्रा देखील काढली होती. विदर्भाचे वेगळे राज्य झाले तर ते कसे सक्षम राज्य म्हणून पुढे येऊ शकते यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी अभ्यासपूर्ण भाषणेही दिली होती. ते मुख्यमंत्री झाल्यावर जेव्हा त्यांना पत्रकारांनी विचारले तेव्हा वेगळ्या विदर्भाचा मी समर्थक आहे, मात्र मला आधी विदर्भ विकसित करायचा आहे असे उत्तर त्यांनी दिले होते. एक मुख्यमंत्री या नात्याने ती पावले उचलण्यास त्यांना निश्चित वाव होता. त्याचा उपयोग करत त्यांनी विदर्भात विकास करण्याचा प्रयत्न निश्चित केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वांची साथ मिळाली तर त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकतील असा विश्वास वैदर्भियांना वाटत आहे.

## भक्ती,व्यसनमुक्ती आणि लोकशक्तीचा अभूतपूर्व संगम

# अज्ञानाचा अंधकार दूर सारत, रंजनपुरात 'आपकी जय' चा गगनभेदी जयघोष

## संत गुलाम महाराजांच्या दिव्य आरतीने हजारो भक्तांचे जीवन लखलखले

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिवाळीच्या मंगलमय लक्ष्मीपूजनाच्या रात्री तळोदा तालुक्यातील रंजनपुर (मोरवड) येथे एक अलौकिक आणि मनोहारी आध्यात्मिक सोहळा संपन्न झाला. 'आपकी जय परिवारातर्फे' आयोजित संत श्री गुलाब महाराजांच्या आरती पूजनाच्या या दिव्य सोहळ्याने केवळ रंजनपूर नव्हे, तर अवघा परिसर व्यसनमुक्ती आणि भक्तीच्या तेजाने उजळून निघाला. संत श्री गुलाम महाराज यांनी १९३७ पासून जो अज्ञानाचा अंधकार दूर व्हावा आणि समाज व्यसनमुक्त व्हावा हा उदात्त हेतू जपला, त्या कार्याचा वारसा घेऊन हा सोहळा २१ ऑक्टोबर २०२५ रोजी हजारो भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या तिन्ही राज्यांतून आलेल्या हजारो भाविकांची उपस्थिती. क्षेत्राच्या सीमा ओलांडून आलेल्या या भक्तगणांमुळे रंजनपूरला खऱ्या अर्थाने अध्यात्मिक मांदियाळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. दिवसभराच्या कार्यक्रमांची सुरुवात सकाळी महाराजांच्या आरतीने झाली, त्यानंतर दिवसभर भजनांचा अखंडित प्रवाह आणि गहन अध्यात्मिक चर्चांनी वातावरण मंत्रमुग्ध झाले. रात्री आठ वाजता भक्तांच्या उत्साहाला अधिक उंची मिळाली, जेव्हा उपस्थित भाविक महिलांसमवेत आरतीची भव्य मिरवणूक सुरू झाली. ही मिरवणूक भक्ती आणि उत्साहाच्या महासागरातून मार्गक्रमण करत संत गुलाम महाराज यांच्या समाधी स्थळापर्यंत पोहोचली. मध्यरात्री ठीक १२ वाजता जेव्हा हा आरती सोहळा संपन्न झाला, तेव्हा उपस्थित प्रत्येक भक्ताच्या चेहऱ्यावर एक दैवी तेज आणि आत्मिक शांतीचा भाव स्पष्ट दिसत होता. हा क्षण केवळ धार्मिक विधीचा नव्हता,



तर महाराजांच्या व्यसनमुक्तीच्या महान कार्याची पुन:प्रतिज्ञा करण्याचा आणि जीवन शुद्ध करण्याचा तो एक दमदार संकल्प होता. या सोहळ्याच्या व्यापकतेची साक्ष देण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये गुजरात राज्यातील डेडीयापाडाचे आमदार चैतर वसावा, तळोदा शहादा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी, अक्कलकुवा अकरानी मतदार संघांचे आमदार आमषा पाडवी, तसेच माजी क्रीडा मंत्री पद्माकर वळवी, काँग्रेसचे राजेंद्र गावीत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासनाच्या वतीने ,नंदुरबार जिल्हा उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये आणि तळोदा पोलीस निरीक्षक राजू लोखंडे व त्यांचे संपूर्ण पथक भक्तिभावाने सहभागी झाले होते. याशिवाय, आध्यात्मिक क्षेत्रातील हिरामण महाराज, किसन महाराज, तसेच गुलाम महाराजांचे वंशज व माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र पाडवी, माजी तळोदा शहादा विधानसभा अध्यक्ष नारायण ठाकरे, मोरवड येथील माजी सरपंच प्रवीण वळवी आणि पोलीस पाटील अशोक पाडवी हे देखील उपस्थित होते. हा सोहळा म्हणजे केवळ एक पूजा नसून, व्यसनमुक्त आणि सुसंस्कृत समाज निर्मितीच्या चिरंतन चळवळीला प्रेरणा देणारा एक महत्त्वाचा आध्यात्मिक उत्सव ठरला, ज्यानंतर हजारो भाविकांनी महाराजांच्या चरणी लीन होऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. हा व्यसनमुक्तीचा जागर महाराष्ट्राच्या आणि सीमावर्ती भागाच्या सामाजिक-अध्यात्मिक इतिहासात सोनेरी अक्षरांनी कोरला गेला आहे.

# तळोद्यात भारत सरकार पुरस्कृत जनजातीय कौशल्य केंद्राचे भव्य उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित जन शिक्षण संस्थानच्या जनजातीय कौशल्य केंद्राचे भव्य उद्घाटन दि. २४ ऑक्टोबर २०२५ तळोदा येथे पश्चिम क्षेत्र सह धर्म जागरण प्रमुख रामानंद काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष विशाल मोहन गावीत, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे सचिव डॉ. नितीन विष्णु पंचभाई, देवगिरी कल्याण आश्रम प्रांतकार्यकर्ते विरेंद्र वळवी, जन शिक्षण संस्थानचे चेअरमन कृष्णा राजकुमार गांधी आणि जन शिक्षण संस्थानचे व्हॉइस चेअरमन अंकुश मोहन शर्मा उपस्थित होते. दिपप्रज्वलन करून देवमोगरा माता, भगवना बिरसा मुंडा व भारत माता यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर मान्यवरांनी नूतन केंद्राची पाहणी




करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जन शिक्षण संस्थान नंदुरबार १ चे चेअरमन कृष्णा गांधी यांनी सांगितले की, देशभरातील २९३ जन शिक्षण संस्थांपैकी केवळ ३० संस्थांची जनजातीय कौशल्य केंद्रासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्रातील केवळ ३ संस्थांमध्ये नंदुरबारच्या डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित जन शिक्षण संस्थानचा समावेश आहे, ही मोठी गौरवाची बाब आहे. प्रमुख अतिथी विरेंद्र वळवी यांनी आपल्या मनोगतात, जन शिक्षण संस्थान मार्फत दिले जाणारे कौशल्य प्रशिक्षण हे शाश्वत आणि उपजीविकेस पूरक आहे. यामुळे जिल्ह्यातील स्थलांतर रोखण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात मदत होईल, असे मत व्यक्त केले. उद्घाटक रामानंद काळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कार्य आता वटवृक्षात रुपांतरित झाले आहे. पारंपरिक कौशल्ये असलेले आदिवासी तरुण नवीन पिढीत या व्यवसायापासून वंचित राहत आहेत. या केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणातून युवापिढीला मुख्य प्रवाहात आणता येईल. अध्यक्षीय भाषणातून विशाल मोहन गावीत यांनी, आदिवासी समाज बांधव वर्षानुवर्षापासून करत असलेल्या पारंपरिक व्यवसायास आधुनिकतेची जोड देत कौशल्य आधारीत प्रशिक्षण देऊन नवोद्योजक निर्माण करण्याचे कार्य या जनजातीय कौशल्य केंद्रामार्फत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप नाईक यांनी केले. जन शिक्षण संस्थान नंदुरबार १ चे संचालक संदीप बच्छाव, कार्यक्रम अधिकारी योगेश पाटील, सहा. कार्यक्रम अधिकारी मयुरी चौधरी, राजश्री मोरे, लेखाधिकारी कविता माळी, संगणक चालक सुरेश शित्रे, उपजिविका अधिकारी गणेश शिंदे, योगेश बारी, जितेंद्र मोरे आणि विकास पाडवी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.


# औरंगपुर येथील श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावन धाम येथे भक्तीचा सोहळा संपन्न

## २५,००० दिव्यांनी झळाळले आकाश!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील औरंगपुर येथील श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावन धाम येथे यंदाही २५,००० दिव्यांचा दिमाखदार दीपोत्सव अत्यंत भक्ती भावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या प्रेरणेतून करण्यात आले.गेल्या अनेक वर्षांपासून पारंपरिक स्वरूपात साजरा होणारा हा दीपोत्सव आज महाराष्ट्र भरात प्रसिद्ध झाला आहे. दीपोत्सव पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकां सह दूरवरच्या गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून आलेल्या भक्तांनी दिव्यांच्या प्रकाशात संत तुकोबाराय यांच्या चरणी आपली भक्ती अर्पण केली.

या दिव्य सोहळ्याला राजकीय,सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून तेज आणले.विशेष म्हणजे अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशरावजी आडसकर साहेब



यांची उपस्थिती सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरली. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्व स्वयंसेवकांनी अथक प्रयत्न केले. दीपोत्सवाच्या निमित्ताने आयोजित संगीत रजनी कार्यक्रमात ह.भ.प.गणेश महाराज भगत यांच्या सुमधुर वाणीने वातावरण मंत्रमुग्ध झाले.या दिव्य दीपोत्सवाने संत तुकोबारायांच्या नामस्मरणाचा जयघोष आकाशात दुमदुमला आणि श्रद्धा,भक्ती व संस्कृतीचा अविस्मरणीय संगम अनुभवायला मिळाला.

# फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करा-डॉ.दत्ता तपसे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी यांच्या आत्महत्येच्या घटनेने संपूर्णराज्यातील वैद्यकीय क्षेत्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.या घटनेला कारणीभूत असणाऱ्या दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी,अशी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची जोरदार मागणी होत आहे.महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेच्या लीगल सेलचे राज्याध्यक्ष डॉ.दत्ता तपसे यांनी सांगितले की,दोषींवर तातडीने कारवाई झाली नाही,तर



राज्यातील सर्व डॉक्टर संपावर जाण्यास भाग पडतील.त्यांनी न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून,येत्या शनिवार पासून अन्नत्याग आंदोलन सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे.दरम्यान,डॉक्टर संघटनांनी भारतीय दंड संहितेतील कलम ३५३ सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला किंवा अडथळा निर्माण करणे, हे कलम सध्या कमकुवतअसल्याचे सांगत ते अधिक मजबूत करण्याची मागणी केली आहे.सरकारी सेवेत कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांवर वारंवार होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांना आळा घालण्या साठी या कलमात कठोर तरतुदी कराव्यात,अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

डॉक्टर संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,जर या प्रकरणातीलआरोपींना तातडीने शिक्षा झाली नाही किंवा शासनाने ठोस नियमावली लागू केली नाही,तर राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल.या घटनेविषयी वैद्यकीय समुदायात तीव्र नाराजी व्यक्त होत असून,डॉक्टर हे समाजाचे सेवक आहेत त्यांच्यावर होणारे अन्याय थांबले पाहिजेत,असा एकमुखी स्वर राज्यभरा तून उमटत आहे.

# संघर्ष योद्धा श्री.खंडेराव जगदाळे सरांच्या सन्मानार्थ 'कृतज्ञतेचा दीपोत्सव' तेजोमय वातावरणात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**शिरोळ । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने दिवाळी पाडवा सणाचे औचित्य साधत कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ गावी
विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष तथा संघर्ष योद्धा श्री. खंडेराव जगदाळे सर यांच्या सन्मानार्थ आयोजित कृतज्ञतेचा दीपोत्सव कार्यक्रम त्यांच्या निवासस्थानी अत्यंत भव्य आणि हृदयस्पर्शी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात राज्यातील विविध भागातून हजारो विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी



सहभागी झाले होते.

सायंकाळी पाच वाजता संघर्ष योद्धा श्री. खंडेराव जगदाळे सर यांच्या सन्मानार्थ आयोजित कृतज्ञतेचा दीपोत्सव कार्यक्रमाला सुरुवात झाली. या सोहळ्याने शिरोळच्या भूमीत भावनांचा आणि प्रकाशाचा समुद्र उसळला होता. शेकडो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विविध संस्थांचे संस्थाचालक, संघटनांचे प्रतिनिधी आणि समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील प्रत्येक कोपरा शेकडो दीपांनी उजळून निघाला आणि त्या प्रत्येक ज्योतीत एकच भाव कृतज्ञतेचा आणि ऐक्याचा दिसून येत होता. या दीपोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक शिक्षक बांधवाने आपल्या हातातील दीपामध्ये एक दीप आदराचा, एक दीप संघर्षाचा आणि एक दीप एकतेचा असा संदेश व्यक्त केला. दीप माळांनी भरलेल्या त्या वातावरणात, शिक्षक चळवळीचा संकल्प आणि श्री. खंडेराव जगदाळे सरांच्या कार्याचा तेज पुन्हा एकदा दिमाखात झळकत होते.

# खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा सह्याद्री मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

## सम्राट बळीराजाची प्रतिमा भेट देऊन दिपावली निमित्त दिल्या शुभेच्छा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा सह्याद्री मराठी पत्रकार संघाच्या वतीने सम्राट बळीराजाची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.शेतकरी पुत्र म्हणून ज्यांनी येडेश्वरी कारखान्याच्या माध्यमा तून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात नवसंजीवनी आणून जिल्ह्यातील जनतेला आर्थिक स्वावलंबी बनवणारे आणि विशेष म्हणजे बीड जिल्ह्याचे दबंग खासदार म्हणून ज्यांची संपूर्ण महाराष्ट्रात च नव्हे तर भारतात ओळख निर्माण केली आहे.शेतकरी कामगार कष्टकरी यांच्या सतत मदतीला धावणारे व शेतकऱ्यांचे सदैव प्रश्न सोडवून त्यांच्या अडी अडचणी समजून घेऊन



अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना ज्या त्या वेळी उपस्थित राहून मदतीला धावून जाणारे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे नाव आज संपुर्ण भारतात आहे.

दिवाळीच्या सणातील बालिप्रतिपदा म्हणजेच जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांचा राजा सम्राट बळीराजाचे स्मरण आपण दिवाळी सणात करत असतो. शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी नांदो ही मागणी सणानिमित्त केली जाते व यामुळे आपल्याला बळीराजा आठवतो तो फक्त त्याच दिवसापुरता न आठवता सदैव बळीराजाची आठवण राहावी या साठी सहयाद्री मराठी पत्रकार संघ केज तथा महाराष्ट्र राज्य यांच्या कडून सम्राट बळीराजाची प्रतिमा,शाल,पुष्पहार देऊन बीड जिल्ह्याचे सर्वांना आपलेसे वाटणारे खासदार श्री.बजरंग बप्पा सोनवणे यांचा सत्कार सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी अध्यक्ष गोविंद शिनगारे, प्रदेशाध्यक्ष डॉ.जावेद शेख,कार्याध्यक्ष शहाजी भोसले,केज तालुकाध्यक्ष अनिल ठोंबरे,सचिव डॉ. लतिफ शेख,कार्याध्यक्ष महादेव दौंड,संघटक लक्ष्मीकांत लासीनकर, उपाध्यक्ष दत्तात्रय भाकरे, सहसंघटक, काशीनाथ कातमांडे यांच्या वतीने दिपावली पाडव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या व यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वतीने ही सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा देऊन सह्याद्री मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सत्कार समारंभाबाबत समाधान व्यक्त केले.

# सांडस चिंचोली गावात शंभर शेतकऱ्यांना नामच्या मोफत बियाण्यांचा लाभ-अजित देशमुख यांच्या हस्ते वाटप

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रख्यात सिने अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशन मार्फत माजलगाव तालुक्यातील सांडस चिंचोली या गावातील शंभर शेतकऱ्यांना मोफत बियाण्यांचा लाभ देण्यात आला. या बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष अजित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. सांडस चिंचोली हे संपूर्ण गाव पाण्याने वेढले होते. या गावाच्या सर्व बाजूने नदीचे पाणी होते. गावात अनेक दिवस जाण्यासाठी रस्ता देखील नव्हता. पुराच्या या भयानक पाण्यामुळे गावात खूप शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे अजित देशमुख यांनी या गावाची निवड केली होती. तीस किलो हरभरा बी आणि आठ किलो ज्वारीचे बी अशा प्रकारचे हे वाटप नाम मार्फत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात लाभ देऊन नामने आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. नाम फाउंडेशनचे



या गावातच नव्हे तर सर्वत्र कौतुक होत आहे. ड. अजित देशमुख यांनी देखील नामचे आभार मानले आहेत. नामच्या या वाटपामध्ये नारायण शेजुळ यांनी विशेष भूमिका बजावली. अजित देशमुख यांच्याशी संपर्क करत सांडस चिंचोली गावाला पुराचा किती मोठा हादरा बसला होता, याची दाहकता त्यांनी निदर्शनास आणून दिली. त्यामुळे या गावाला मोफत देण्याचा लाभ मिळाला.

# जोपर्यंत कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार नाहीत तोपर्यंत शांत बसणार नाही-बैठकीत आ.संदीप भैय्या ची ग्वाही

## ओबीसी मराठा वाद डोक्यातून काढा-आ.संदीप क्षीरसागर

## बीड आणि शिरूर (का) तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

जोपर्यंत कार्यकर्त्यांच्या निवडणूका होत नाहीत तोपर्यंत शांत बसणार नाही आणि अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना आयुष्यभर विसरणार नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठकीतून सांगितले.बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.२४ (शुक्रवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद चंद्र पवार गट) च्या वतीने आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आ. संदीप क्षीरसागर यांनी बोलावलेल्या या बैठकीला पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.याबैठकीला कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले.



यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, माझ्या आमदारकीच्या निवडणुकीत अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना आयुष्यभर विसरणार नाही. विधानसभेच्या वेळी कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी काम केलं आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्यासाठी काम करणार आहे. जोपर्यंत कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार नाहीत तोपर्यंत मी आराम करणार नाही. आताच्या घडीला तरी आपल्या समोर कोणीच दिसत नाही. कारण आपण रस्त्यावर उतरून काम करणारे कार्यकर्ते आहोत.त्यामुळे जनतेचा आपल्याला पाठिंबा आणि आशीर्वाद मिळतोय. आपल्या पक्षाची भूमिका ही स्पष्ट आणि ठोस आहे. जवळची माणसं सोबत असल्याने ठोस आणि ठामपणे भूमिका घेतो. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सर्व कार्यकर्त्यांनी ओबीसी मराठा वाद डोक्यातून काढला पाहिजे. सर्वसामान्य लोकांसाठी रस्त्यावर उतरून काम करा. राज्य सरकारच्या पॅकेज ने शेतकरी बांधव संतुष्ट नाही. सरकारला देखील ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये पराभव दिसत असल्याने नगरपालिकेची निवडणूक ही जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या अगोदर घेत आहेत. कार्यकर्त्यांना आवाहन करताना आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, कार्यकर्त्यांनो गुत्तेदारीसाठी निवडणुका लढू नका. अगोदरच स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रशासक असल्याने नागरिकांचे कामे रखडली आहेत. लोकांच्या कामासाठी रस्त्यावर उतरून प्रश्न मार्गी लावा. ही जनता काम करणाऱ्याच्या कायम पाठीशी उभी राहते. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माझ्या अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत विजय खेचून आणायचा आणण्यासाठी चेन पद्धतीने चालायाचे आहे. चेन पद्धतीने आपण मोठ्या फरकाने विजय मिळवू असा विश्वास देखील दिला. कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकदीने निवडणूक लढवून जिल्हा परिषद व पंचायत समिती ताब्यात आणण्याचा संकल्प केला आहे. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राज्याचे प्रवक्ते शिवराज बांगर, वैजनाथ तांदळे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाहेरच्या लोकांनी बीड मध्ये जातीवाद करून अस्थिरता निर्माण करू नये-आ.संदीप क्षीरसागर

**राज्यात किंवा बीड जिल्ह्यात एखादी वाईट घटना घडली की बीड पासून मोर्चे आंदोलने काढली जातात. हे मोर्चे आंदोलने काढणारे मुळात बीडचे नसतात. हे सर्व जातीवादी लोक बाहेरच्या जिल्ह्यातील असतात. त्यांच्याकडून बीडचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जातो. निवडणुका आल्या की हिंदू मुस्लिम, ओबीसी मराठा वाद निर्माण करायचा. यातून आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची असते. या बीडमध्ये आम्ही सर्व समाज गुण्यागोविंदाने राहतो. त्यामुळे परळी सारखा पॅटर्न बीडमध्ये घडत नाही. बाहेरील जिल्ह्यातील लोकांकडून बीडचे वातावरण अस्थिर केले जात आहे. त्यांच्या भूलथापांना बळी न पडता सर्व समाजाने आंदनात राहून एकत्र असल्याचे दाखवून द्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले.**

# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मंगेश चिवटेंचा मदतीचा हात!

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक लाखांचा धनादेश केला सुपूर्द



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दीपावली-पाडवा निमित्त भेटून मंगेश चिवटे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांसाठी एक संवेदनशील आणि समाजहितकारी पाऊल उचलत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीस एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.या प्रसंगी मंगेश चिवटे यांनी सांगितले की, पूरग्रस्तांच्या मदतीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे ही आजची गरज आहे. संकटाच्या काळात एकमेकांना हात देणं हीच खरी दिवाळीची भावना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करत मंगेश चिवटे यांचे सामाजिक बांधिलकीबद्दल अभिनंदन केले आणि समाजातील इतर तरुणांनाही अशा कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. ही भेट आणि मदतीचा उपक्रम 'वर्षा' निवासस्थानी पार पडला असून, दिवाळीच्या या सणात समाजसेवेची दीपज्योत उजळवणारा हा उपक्रम म्हणून सर्वत्र प्रशंसेचा विषय ठरला आहे.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे बलिप्रतिपदेनिमित्त भक्तिभावाने महारुद्राभिषेक,सेज पूजा व दीपोत्सवाचा दिव्य सोहळा

### दीपोत्सवाच्या प्रकाशात भक्तिरसाने न्हाऊन निघाले श्रीक्षेत्र कपिलधार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बलिप्रतिपदा पाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीस्थळी अत्यंत भक्तिभावाने महा रुद्राभिषेक व सेज पूजेचा दिव्य सोहळा पार पडला. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंदिर परिसर सुवासिक फुलांच्या आरासीत सजवण्यात आला होता, तर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.



या पवित्र दिवशी सकाळी लवकर मंत्रोच्चार, वेदमंत्र आणि पुरोहितांच्या सान्निध्यात रुद्राभिषेक विधी पार पडला. त्यानंतर सेज पूजा व दीपोत्सव कार्यक्रम पार पडला. भक्तांच्या जयघोषाने आणि मन्मथ स्वामींच्या जयघोषाने वातावरण भारावून गेले होते.

या मंगल सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

विशेषतः या पूजेसाठी बालाघाटचे युवा उद्योजक अशोक (दादा) रसाळ, पंडित रसाळ सहपरिवार, तसेच दत्त संस्थानचे मठाधिपती श्री वैजिनाथ महाराज शिंदे, मन्मथ स्वामी देवस्थानचे पूजा पुरोहित श्री विश्वनाथ स्वामी महाराज, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार,आणि दै. लोकमंथनचे जिल्हा प्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना मुंबई, बीड जिल्हा सहसचिव अमोल शिंदे सहपरिवार यांनी उपस्थित राहून श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे दर्शन घेतले व मनोभावे पूजा केली.मंदिराची फुलांनी सजवलेली आरास आणि दिव्यांची लखलखीत रोषणाई पाहण्यासाठी दूरदूरवरून भाविकांनी कपिलधार गाठले. संध्याकाळी आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तांनी दीपोत्सवाचा आनंद घेत 'जय मन्मथ स्वामी' च्या जयघोषात संपूर्ण कपिलधार भक्तिरसात न्हाऊन निघाले.

या निमित्ताने कपिलधार क्षेत्रात उत्सवी आणि पवित्र वातावरण निर्माण झाले होते. भाविकांच्या श्रद्धा, भक्ती आणि आनंदाने भरलेला हा दिव्य सोहळा सर्वांच्या मनात कायमचा कोरला गेला.

# राहुल गवळी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) बीड शहराध्यक्षपदी नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष मा.खा. सुनिल तटकरे आणि मा. धनंजय मुंडे साहेब यांच्या शिफारशीनुसार बीड शहराध्यक्षपदी राहुल अशोक गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या निवडीच्या निमित्ताने बीडमध्ये एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, अशोक हिंगे, नगरसेवक अमर नाना नाईकवाडे, फारुक पटेल, विनोद मुळूक, रंजित बनसोडे, रमेश चव्हाण, महेश धांडे, रोहन गायकवाड, माऊली गायकवाड, पक्षाचे प्रवक्ते भागवत तावरे, अजिंक्य आनेराव आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत राहुल गवळी यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांचे पुष्पगुच्छ व सत्कार करून अभिनंदन केले आणि आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी बोलताना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, राहुल गवळी यांच्या खांद्यावर पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार करणे आणि संघटनात्मक बळकटी करणे ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

सत्काराला उत्तर देताना राहुल गवळी यांनी सांगितले, माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मी मनःपूर्वक आभार मानतो. बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट करण्यासाठी मी विविध उपक्रम व संकल्पना राबवणार आहे. युवकांना जोडून पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहीन.

# १९९६ च्या वसंत विद्यालयातील विद्यार्थ्यांचा दुसरा स्नेहमिलन उत्साहात संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शालेय जीवनातील आठवणी कधीच विसरता येत नाहीत. त्या आपणजवळ जपून ठेवलेल्या गोड गल्ल्या असतात, असे प्रतिपादन करत केज येथील वसंत महाविद्यालयातील सन १९९६ च्या दहावीच्या वर्गमित्रांनी पुन्हा एकदा एकत्र येत दुसरा स्नेहमिलन सोहळा उत्साहात साजरा केला. लालपरी हॉटेल येथे झालेल्या या स्नेहभोजन प्रसंगी जुन्या आठवणीना उजाळा देत मैत्रीची वीण अधिक घट्ट विणली गेली.

या स्नेहमिलनाचे आयोजन इजिनीयर राहुल तांदळे व ड. प्रमोद नाईकवाडे यांनी केले होते. अनेक वर्षांनी एकत्र आलेल्या या मित्रांनी त्या दिवसांची आठवण काढत चहूबाजूंनी आनंद आणि हशा पेरला. गप्पा, आठवणी, खेळलेले मैदान, वसंत विद्यालयातील दिवस, गुरुजनांच्या शिकवणी अशा गप्पांची मैफल रंगली. कार्यक्रमास डॉ. प्रदिप गुळभिले, सुभाष तांबारे (पो. ठाणे केज), प्रा. देविदास पाटील, प्रा. विजय देशमुख, इजिनीयर राहुल तांदळे, ड. प्रमोद नाईकवाडे, निरीजन गिरी सर तसेच दैनिक वादळ वार्ता चे संपादक अजय भांगे आदी मान्यवर उपस्थित होते. वेगवेगळ्या क्षेत्रात स्थिरावलेले हे सर्व विद्यार्थी आजही आपण वसंत विद्यालयाचेच आहोत, हा अभिमान मनात ठेवून भेटले. जीवनाच्या विविध वाटांवर प्रवास करत असताना ही मैत्री कधीही न तुटणारी राहावी, अशी भावना सर्वांच्या मनात व्यक्त होत होती. या प्रसंगी आगामी वर्षी स्नेहमिलन भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपस्थित मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले. भावना, जिव्हाळा आणि आठवणींनी रंगलेला हा स्नेहमिलन सोहळा आनंदाच्या लखलखत्या क्षणांनी मनाला पुन्हा एकदा शालेय दिवसात नेऊन ठेवणारा ठरला.

# आरएसएस ही रजिस्टर्ड संस्था नसताना सुद्धा पैसे गोळा करते:नाना पटोलेंची टीका

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर (वृत्तसंस्था)**

आरएसएस ही रजिस्टर्ड संस्था नसताना सुद्धा पैसे गोळा करत आहे. गोळा केलेल्या पैशाचा हिशोब आरएसएसने जनतेला दिलाच पाहिजे. शासनाने यात लक्ष घातले पाहिजे, असे मत काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी व्यक्त केले आहे. आरएसएसला बंदी घालावी, या मागणीला घेऊन वंचित बहुजन आघाडी आणि आंबेडकर अनुयायी रस्त्यावर उतरले आहेत, यावर नाना पटोले यांनी आपले विचार मांडले आहेत.नाना पटोले म्हणाले, जेव्हा एखाद वेळी समूह एकत्र येतात. त्यामुळे ते पैसे गोळा होतात. ती संस्था काय करते? त्या संस्थेचा मूळ उद्देश काय आहे? या सगळ्या गोष्टी रजिस्ट्रेशनमध्ये असतात. यांचे कुठलेही रजिस्ट्रेशन झाले नसल्यामुळे हा प्रश्न सगळ्यांच्या समोर आहेच. काँग्रेसच्या सत्तेमध्ये सुद्धा त्या प्रकारचा अनेकदा प्रयत्न झाला. पण आता जनतेमध्ये त्या पद्धतीचा एक वातावरण मान होत असेल तर शासनाने त्यात लक्ष घातले पाहिजे.छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात महिलांचा जो सन्मान होत होता. तो आता महायुतीच्या सरकारमध्ये होत नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील महिला अत्याचाराच्या घटना समोर येत आहे. केंद्रात भाजपचे सरकार आहे. त्यांनीच नॅशनल क्राइम ब्युरोच्या सादर केलेल्या रिपोर्टमध्ये महाराष्ट्रात महिलांवर सर्वाधिक अत्याचार होत असल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र आता महिलांसाठी असुरक्षित राज्य झाल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.सातारा येथील डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या प्रकरणावर बोलताना नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील महिला अत्याचाराच्या घटना समोर येतात आहेत. कर्मचारी असो की सामान्य महिला त्यांच्यावर सातत्याने अत्याचार होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. नॅशनल क्राइम ब्युरोचा जो आता रिपोर्ट आलेला आहे, त्यात महाराष्ट्र महिलांसाठी आता असुरक्षित आहे. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण सर्वात जास्त असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077